आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
९ फेब्रुवारी २०२५ रविवार

**ठळक बातम्या**

- छत्तीसगडमधे सुरक्षादलासोबतच्या चकमकीत १२ नक्षलवादी ठार, दोन जवानांना वीरमरण

- दिल्ली विधानसभा निवडणुकीतल्या पराभवानंतर आतिशी यांचा मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा

- देशात विविध ठिकाणी झालेल्या अपघातात सात जणांचा मृत्यू, दहा जण जखमी

**आणि**

- ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्राची २५ सुवर्ण पदकांसह एकूण ११३ पदकांची कमाई

<><><><><>

छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात आज सकाळी सुरक्षादलं आणि नक्षलवाद्यांत झालेल्या चकमकीत किमान १२ नक्षली ठार झाले. यात दोन जवानांना वीरमरण आलं आहे तर दोन जवान जखमी झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. नक्षलवाद्यांबरोबरची चकमक अद्याप सुरू आहे.

बिजापूर इथल्या इंद्रावती राष्ट्रीय उद्यान परिसरातील जंगलात सुरक्षा दलानं आज सकाळी शोधमोहिम सुरू केली. ही मोहिम सुरू असताना नक्षलवाद्यांनी त्यांच्यावर गोळीबार केला. सुरक्षा दलाच्या जवानांनी त्याला चोख प्रत्युत्तर दिलं. यात १२ नक्षलवादी ठार झाले असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या चकमकीत राज्य पोलीस दलाचा एक कर्मचारी तर स्पेशल टास्क फोर्सचा एक असे दोन जवान शहीद झाले, तर दोनजण जखमी झाल्याची माहिती पोलिस अधिकाऱ्यानं दिली.

<><><><><>

जम्मू-काश्मीरच्या राजौरी जिल्ह्यातल्या केरी सेक्टर इथल्या नियंत्रण रेषेजवळ दहशतवाद्यांचा घुसखोरीचा प्रयत्न लष्करानं हाणून पाडला. नियंत्रण रेषेजवळ गस्त घालणाऱ्या पथकावर दहशतवाद्यांनी गोळीबार केला. त्याला जवानांनी चोख प्रत्युत्तर दिलं. या परिसराची नाकाबंदी केली असून दहशतवाद्यांचा शोध घेतला जात आहे.

<><><><><>

दिल्ली विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाचा पराभव झाल्यानंतर मुख्यमंत्री आतिशी यांनी आज नायब राज्यपाल व्ही. के. सक्सेना यांची भेट घेऊन त्यांच्याकडे राजीनामा सुपूर्द केला. नव्या सरकारची स्थापना होईपर्यंत आतिशी काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून काम पाहतील.

दिल्ली विधानसभेच्या काल जाहीर झालेल्या निकालात भाजपाने जवळपास तीन दशकांनंतर जोरदार पुनरागमन करत ७० पैकी ४८ जागांवर विजय मिळवला, आम आदमी पक्षाला २२ जागांवर समाधान मानावं लागलं, तर काँग्रेसला भोपळा फोडण्यात अपयश आलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी परदेश दौऱ्यावरून परतल्यानंतर भाजपा सत्तास्थापनेचा दावा करण्याची शक्यता आहे. दिल्लीत भाजपाला मिळालेला विजय हे भाजपाच्या डबल इंजिन सरकारवर देशाच्या असलेल्या विश्वासाचं प्रतीक असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्र्यांनी काल दिल्ली भाजपा मुख्यालयात कार्यकर्त्यांशी बोलताना केलं.

**दरम्यान**, काल जाहीर झालेल्या पोटनिवडणुकांच्या निकालात उत्तर प्रदेशातल्या मिलकीपूर विधानसभा मतदारसंघातून भाजपाचे चंद्रभानू पासवान विजयी झाले आहेत, तर तमिळनाडूच्या इरोड पूर्व विधानसभा मतदारसंघातून द्रविड मुन्नेत्र कळगम पक्षाचे चंदिराकुमार व्ही. सी. यांनी बाजी मारली आहे.

<><><><><>

यमुना नदीकाठाचा विकास करण्याला आपल्या पक्षाचं प्राधान्य असेल, असं आश्वासन भाजपचे नेते आणि दिल्लीच्या मुख्यमंत्री पदाचे प्रमुख दावेदार परवेश वर्मा यांनी आज दिलं. दिल्लीत विधानसभा निवडणुकीत विजय मिळाल्यानंतर परवेश वर्मा यांनी मुंडका या मूळ गावी जाऊन त्यांचे वडील आणि माजी मुख्यमंत्री साहेब सिंह वर्मा यांना आदरांजली वाहिली त्यानंतर ते बातमीदारांशी बोलत होते. दिल्लीतल्या ग्रामीण भागाकडे राज्य सरकारनं प्रचंड दुर्लक्ष केल्याचा आरोपही वर्मा यांनी केला.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या सोमवारपासून फ्रान्स आणि अमेरिकेच्या दौऱ्यावर जाणार आहेत. दोन्ही देशांसोबत धोरणात्मक, आर्थिक आणि तंत्रज्ञानविषयक भागीदारी आणखी बळकट करणं यावर त्यांच्या या दौऱ्यात मुख्य भर असणार आहे. फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉ यांच्या आमंत्रणावरून प्रधानमंत्री १० ते १२ फेब्रुवारी दरम्यान फ्रान्सला भेट देणार आहेत. पॅरिसमध्ये आयोजित एआय कृती शिखर परिषदेचं सह-अध्यक्ष पद ते भूषवतील. या शिखर परिषदेत कृत्रिम बुद्धिमत्तेच्या व्यवस्थापनाचं भविष्य या विषयावर विविध राष्ट्रांचे नेते चर्चा करणार आहेत.

फ्रान्सची भेट आटोपून १२ फेब्रुवारीला प्रधानमंत्री अमेरिकेला रवाना होतील.

<><><><><>

पहिली जागतिक दृकश्राव्य मनोरंजन परिषद म्हणजेच ‘वेव्हज्’ भारताला आशयनिर्मितीचे जागतिक केंद्र म्हणून उदयाला आणेल, असं केंद्रीय माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. सर्जनशीलतेचे शक्तीपीठ बनण्याच्या

दृष्टीनं भारतात पाया रचला जात आहे, असं त्यांनी सांगितलं. वेव्हज् परिषदेच्या निमित्तानं जगभरातल्या माध्यम क्षेत्रातल्या अव्वल कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, मनोरंजन विश्वातले दिग्गज, सर्जनशील विचारवंत एकाच व्यासपीठावर येतील, असं ते म्हणाले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी वेव्हजच्या सल्लागार मंडळाची बैठक घेतली. या वर्षी पहिली वेव्हज् परिषद १ ते ४ मे दरम्यान मुंबईत होणार आहे, अशी माहिती वैष्णव यांनी दिली.

<><><><><>

विमा, निवृत्तीवेतन आणि शेअर बाजार हे तीन स्तंभ देशाच्या आर्थिक विकासाचे तीन महत्त्वपूर्ण पैलू असून या माध्यमातून आलेली गुंतवणूक उद्योगव्यवसायांना समृद्ध करु शकते, असं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. नागपूर इथं झालेल्या गुंतवणूकदार प्रशिक्षण परिषदेत ते काल बोलत होते. आर्थिक वाढीसाठी आर्थिक साक्षरता महत्वाची असून यामध्ये लोकांना जागृत करण्याची आवश्यकता आहे, वित्त पुरवठ्याचे स्त्रोत आणि तंत्रज्ञानापेक्षाही विश्वासाहर्ता अधिक महत्वाची असते, असं गडकरी म्हणाले. देशाला आत्मनिर्भर करण्यासाठी आपल्याला प्रत्येक क्षेत्रात सर्वांगीण प्रगती करावी लागेल, असं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

मध्यप्रदेशातल्या सतना इथं आज पहाटे झालेल्या दोन वाहनांच्या अपघातात तीन जणांचा मृत्यू झाला असून दहा जण जखमी झाले आहेत. अपघातग्रस्त मिनी ट्रक भाविकांना प्रयागराज इथं कुंभमेळ्याला घेऊन जात होती. अपघात झाल्यानंतर सतना - चित्रकुट रस्त्यावर  बराच काळ वाहतूक कोंडी झाली होती. जखमींवर उपचार सुरू असल्याचं पोलिसांनी सांगितलं.

<><><><><>

गुजरातच्या बनासकांठा जिल्ह्यात वाळू घेऊन जाणारा डंपर अंगावर पडल्यानं तीन महिला आणि एका लहान मुलाचा मृत्यू झाला. इथं रस्त्याचं काम सुरू असताना एका अरुंद वाटेवरून जाण्याच्या प्रयत्नात असलेला डंपर उलटला आणि काम करणाऱ्या मजुरांच्या अंगावर पडला. यात मृत्युमुखी पडलेल्यांना क्रेन आणि बुलडोझरनं बाहेर काढून रुग्णालयात नेलं, पण तिथं त्यांना मृत घोषित केल्याची माहिती पोलिसांनी दिली.

**<><><><><>**

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्रानं सर्वाधिक ११३ पदकांची कमाई केली आहे. यात २५ सुवर्ण, ४२ रौप्य आणि ४६ कांस्यपदकांचा समावेश आहे. पदकतालिकेत ४२ सुवर्णपदकांसह सेना दलाचा संघ पहिल्या, तर ३० सुवर्णपदकांसह कर्नाटकाचा संघ दुसऱ्या स्थानावर आहे. महाराष्ट्रानं तिसरं स्थान कायम राखलं आहे. यजमान उत्तराखंडचा संघ १४ सुवर्णपदकांसह सहाव्या स्थानी आहे.

**<><><><><>**

केंद्रीय लोकसेवा आयोगानं नागरी सेवा प्राथमिक परीक्षा २०२५ साठी अर्ज भरण्याची अंतिम मुदत येत्या १८ फेब्रुवारीपर्यंत वाढवली आहे. याशिवाय, अर्जात काही बदल असल्यास त्यात दुरुस्ती करण्याची मुदत १९ ते २५ फेब्रुवारी पर्यंत असणार आहे.

यापूर्वी परीक्षेसाठी ऑनलाइन अर्ज करण्याची शेवटची तारीख ११ फेब्रुवारी होती. केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे दरवर्षी नागरी सेवा परीक्षा, प्राथमिक, मुख्य परीक्षा आणि मुलाखत या तीन टप्प्यांत घेतली जाते.

**<><><><><>**

नवी दिल्लीत भारत मंडपम इथं सुरु असलेल्या ५२ व्या जागतिक पुस्तक मेळाव्याची आज सांगता होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते या मेळाव्याचं उदघाटन झालं होतं. शैक्षणिक पुस्तकांपासून आत्मचरित्र आणि कादंबऱ्या अशी विपुल साहित्य संपदा असलेला हा मेळावा राष्ट्रीय पुस्तक न्यास आणि भारत व्यापार प्रोत्साहन संस्थेनं आयोजित केला आहे. या पुस्तक मेळ्यात पुस्तकप्रेमींना एकाच ठिकाणी जगभरातलं विविध प्रकारचं साहित्य उपलब्ध झालं. याशिवाय, लेखकांचं चर्चासत्रं, पुस्तकांचा लोकार्पण सोहळा, साहित्यिक सत्रं आणि सांस्कृतिक कार्यक्रम देखील आयोजित करण्यात आले होते.

<><><><><>

त्रिपुरा सरकारनं काल आगरतळा इथं समारोप झालेल्या दोन दिवसीय डेस्टिनेशन त्रिपुरा बिझनेस कॉन्क्लेव्हमध्ये शिक्षण, आरोग्यसेवा, कृषी आणि आयटी क्षेत्रातील ८७ खाजगी गुंतवणूकदारांसोबत ३ हजार ७०० कोटी रुपयांचे सामंजस्य करार केले आहेत.

<><><><><>

भारत आणि इंग्लंड  यांच्यात सुरू असलेल्या तीन सामन्यांच्या मालिकेतला दुसरा सामना आज कटक मधे बाराबती इथं सुरू आहे. इंग्लंडनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे. या मालिकेत भारत १-० नं आघाडीवर आहे.

<><><><><>

मुंबई खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत महिला दुहेरीच्या अंतिम फेरीत आज  प्रार्थना थुंबारे आणि अरियाना हावतोनो यांच्या जोडीचा सामना रशियाच्या  अमिना अंशबा आणि एलेना प्रिडांकिना या जोडीशी होणार आहे.

//<><><><><><>//